Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 15 June 2024

Time: 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १५ जून २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

**ठळक बातम्या**

- **आषाढी वारीत सहभागी दिंड्यांना वीस हजार रुपये अनुदान– मुख्यमंत्र्यांची घोषणा**
- **कृषी निविष्ठांच्या कृत्रिम टंचाई प्रकरणी धडक कारवाई–कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची माहिती**
- **नीट प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा परिषदेला नोटीस**
- **उन्हाळी सुट्यानंतर शाळांच्या नवीन शैक्षणिक वर्षाला आजपासून प्रारंभ**

**आणि**

- **टी–ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा कॅनडासोबत सामना**

**सविस्तर बातम्या**

पंढरपूरच्या आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या दिंड्यांना वीस हजार रुपये अनुदानाची घोषणा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. काल मुंबईत झालेल्या विशेष बैठकीत ते बोलत होते. वारकऱ्यांसाठी गटविमा योजना लागू करण्याची, तसंच वारकऱ्यांच्या वाहनांना गतवर्षीप्रमाणेच टोल माफी देण्यात येईल, असंही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलं. दौंड इथं भीमा नदी काठचा

कत्तलखाना रद्द करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. वारकऱ्यांच्या सोयीसुविधांसाठी सर्व बाबींचं काटेकोर नियोजन केल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

दरम्यान, आषाढी वारीसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील काल पुण्यात एका बैठकीत आढावा घेतला. पालखी मार्गाला लागून असलेल्या जागा कायमस्वरूपी ताब्यात घेऊन त्याचा पालखी सोहळा वगळता इतर वेळी अन्य उपयोग करण्याबाबत प्रस्ताव तयार करावा, अशा जागांवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेण्याची सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी दिली.

दरम्यान, अमरावती इथल्या कौंडिण्यपूरहून रुक्मिणी मातेच्या पालखीने काल आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान केलं.

****

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन मुंबईत येत्या २७ जून ते १२ जुलै या कालावधीत होणार आहे. राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प २८ जून रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येईल. या अधिवेशनात एकूण तेरा दिवस कामकाज चालणार आहे.

****

राज्यात कृषी निविष्ठांची कृत्रिम टंचाई भासवली जात असून, या प्रकरणी धडक कारवाई केली जात असल्याचं, कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितलं आहे. ते काल बीड इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. राज्यात बी-बियाणे, खते, कीटकनाशकांचा कुठेही तुटवडा भासू देणार नाही, याबाबत शासन स्तरावर कृती दल नेमून नियोजन करण्यात येत असल्याची माहिती मुंडे यांनी यावेळी दिली.

दरम्यान, बीड जिल्ह्यात महावितरण कडील प्रलंबित कामं, पावसाळ्याचं नियोजन, विविध योजना आदींच्या संदर्भात काल मुंडे यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली

****

खरीप पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी, पिकांवरील कीड रोग नियंत्रणासाठी कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी गावपातळीवर जावून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या सूचना क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी दिल्या आहेत. लातूर जिल्ह्यात उदगीर इथं खरीप हंगाम आढावा बैठकीत ते काल बोलत होते. प्रत्येक कृषि सेवा केंद्रांवर एका कृषी सहाय्यकाची नेमणूक करावी, अशा सूचना बनसोडे यांनी यावेळी दिल्या.

****

राज्यातल्या एक हजार दोनशे पंचेचाळीस दुष्काळ सदृष्य महसुली मंडळात चारा डेपो उभारण्यास शासनानं परवानगी दिली आहे. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल मुंबईत ही माहिती दिली. सध्या राज्यात ५१२ लाख ५८ हजार मेट्रिक टन हिरवा चारा, तर १४४ लाख ५५ हजार मेट्रिक टन सुका चारा उपलब्ध आहे. हा चारा जूनअखेरपर्यंत पुरेल असा अंदाज शासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

****

राहुरी इथलं महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण-मेडा यांनी राज्यस्तरीय सहभागातून, हरित हायड्रोजन निर्मिती प्रकल्पासाठी सामंजस्य करार केला आहे. या प्रकल्पामध्ये कृषी अवशेष तसंच शहरी घनकचरा यांच्यावर प्रक्रिया करून हायड्रोजन इंधन तयार केलं जाईल आणि त्यापासून वीजनिर्मिती केली जाणार आहे.

****

कुवैतमध्ये अग्निकांडात मरण पावलेल्या ४५ भारतीय नागरिकांचे मृतदेह काल भारतात पोहोचले. या दुर्घटनेतल्या मृतांमध्ये केरळमधील २३, तामिळनाडू ७, आंध्रप्रदेश ३, उत्तर प्रदेश ३, ओडिशा २ आणि बिहार, पंजाब, कर्नाटक, पश्चिम बंगाल, झारखंड, हरियाणा तसंच महाराष्ट्रातून प्रत्येकी एक अशा एकूण ४५ जणांचा समावेश आहे. मुंबईत मालाड इथले ३३ वर्षीय डेनी करुणाकरन यांचाही या दुर्घटनेत मृत्यू झाला आहे. या

दुर्घटनेत मृतांच्या कुटुंबीयांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन लाख रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे.

****

वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेश पात्रता परीक्षा-नीटमध्ये झालेल्या कथित अनियमितता प्रकरणी, केंद्रीय अन्वेषण विभाग-सीबीआय चौकशीच्या मागणीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं, केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा परिषदेकडून दोन आठवड्यात उत्तर मागवलं आहे. काल एका जनहित याचिकेवर सुनावणी दरम्यान, न्यायालयानं हे निर्देश दिले. या प्रकरणी विविध उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित प्रकरणं सर्वोच्च न्यायालयात हलवण्याबाबत राष्ट्रीय परीक्षा परिषदेच्या याचिकेवर न्यायालयानं इतर पक्षांना नोटीस जारी केली आहे.

दरम्यान, नीट परीक्षा प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उमेदवारांच्या हिताची खात्री करण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी ट्विटरवरील संदेशात म्हटलं आहे. कोणत्याही विद्यार्थ्याच्या भविष्याशी तडजोड केली जाणार नाही असं आश्वासन त्यांनी दिलं आहे.

दरम्यान, नीट परीक्षा देश पातळीवर पुन्हा एकदा नव्याने घ्यावी अशी मागणी करत नांदेडमध्ये जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने काल मोर्चा काढण्यात आला. शहरातल्या भाग्यनगर ते महात्मा फुले चौकापर्यंत काढलेल्या या मोर्चात विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

****

येत्या २१ जून रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची तयारी जगभरात मोठ्या उत्साहात सुरु आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल त्रिकोणासनावरील एक चित्रफित सामाजिक माध्यमांवर प्रसारित केली. एकाग्रतेसाठी तसेच कमरेच्या वरील भागातील स्नायूंची लवचिकता सुधारण्यासाठी या आसनाचा सर्वांनी सराव करावा असं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

****

उन्हाळी सुट्यानंतर राज्य शिक्षण मंडळाच्या नवीन शैक्षणिक वर्षाला आजपासून प्रारंभ होत आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अनेक शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात येणार असून, त्यासाठी शालेय शिक्षण विभागाने तयारी केली आहे. जिल्ह्यातल्या महानगरपालिकेच्या सर्व शाळा, बालवाड्या, १६ जिल्हा परिषदेच्या शाळा आणि ९५ खासगी अनुदानित शाळांमधल्या ३८ हजार विद्यार्थ्यांना आज नियमित पोषण आहारासोबतच मिठाई देण्यात येणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं वस्तू आणि सेवा कर विभागाचं अपिलीय न्यायाधीकरण खंडपीठ कार्यान्वित करण्याची मागणी, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. या मागणीचं पत्र त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे सादर केलं. महाराष्ट्र आणि गोवा राज्यातल्या अपीलांवर देखरेख करण्यासाठी राज्यात तीन खंडपीठं स्थापन करण्यात येणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना कॅनडासोबत होणार आहे. फ्लोरिडा इथं होणारा हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता सुरु होईल.

दरम्यान, या स्पर्धेत अ गटातून अमेरिका आणि भारताने अंतिम आठ मध्ये स्थान मिळवलं असून, पाकिस्तान आणि आयर्लंड या संघांचं आव्हान संपुष्टात आलं आहे. काल अमेरिका आणि आयर्लंड दरम्यानचा सामना पावसामुळे रद्द झाला. या स्पर्धेत सध्या दक्षिण आफ्रिका विरुद्ध नेपाळ आणि न्यूझीलंड विरुद्ध युगांडा हे सामने सुरु आहेत.

****

माजी सहकार राज्यमंत्री डॉ. जयप्रकाश मुंदडा यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. मुंदडा यांनी हिंगोली विधानसभा मतदारसंघातून चार वेळा शिवसेनेचे प्रतिनिधित्व केलं आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात काल वीज पडून एकाचा मृत्यू झाला, तर तीन जण जखमी झाले. सेनगाव तालुक्यातल्या खांबासिनगी इथं ही घटना घडली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही अशाच घटनेत एकाचा मृत्यू झाला. वैजापूर तालुक्यातल्या शिवराई शिवारात ही घटना घडली.

****

जालना जिल्ह्यातल्या बदनापूर तालुक्यात काल दुपारी चार वाजेच्या सुमारास जोरदार पाऊस झाला. सुमारे पाऊण तास झालेल्या या पावसामुळे खरिपातील लागवड झालेल्या पिकांना दिलासा मिळाला आहे.

****

बीड जिल्ह्यात १२ जून अखेरपर्यंत जिल्ह्याच्या ११ तालुक्यात ३८ हजार ५९६ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजूरकर यांनी ही माहिती दिली. यंदा सोयाबीनचे भाव पडल्याने शेतकऱ्यांनी कापूस आणि तूर या दोन पिकांवर अधिक भर दिल्याचं दिसून येत आहे.

****

धाराशिव जिल्ह्याला यावर्षी पावसाळ्यात एक कोटी २९ लाख ४० हजार वृक्ष लागवडीचं उद्दिष्ट विभागीय आयुक्तांनी दिलं आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी सचिन ओंबासे यांनी जिल्ह्यातल्या सर्व शासकीय विभागांना वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट आणि त्यासंबंधीच्या सूचना दिल्या आहेत.

****

वृक्ष लागवड, लेक लाडकी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले आहेत. विविध शासकीय योजनांचा आढावा घेताना ते काल बोलत होते. या बैठकीत विविध योजनांचा जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला.

****

इतिहास संशोधक डॉ केदार फाळके लिखित 'श्री शिवराज्याभिषेक–नव्या युगाचा प्रारंभ' या पुस्तकाचं आज छत्रपती संभाजीनगर इथं प्रकाशन होणार आहे. तापडीया नाट्य मंदिरात सायंकाळी साडे पाच वाजता हा प्रकाशन सोहळा होणार आहे.

****

रेल्वे रुळाच्या दुरुस्ती कामामुळे नांदेड–मनमाड–नांदेड ही जलदगती रेल्वे उद्या १७ जून पासून १४ जुलै पर्यंत नांदेड ते पूर्णा दरम्यान अंशत: रद्द करण्यात आली आहे. या कालावधीत ही गाडी पूर्णा ते मनमाड अशी धावेल.

****